


# पारनेर दर्शन




वर्ष ३ अंक ३३, शनिवार २१ डिसेंबर २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# कांद्यावरील निर्यात शुल्क हटवा

**■ खा. नीलेश लंके यांची पियुष गोयल, जितिन प्रसाद यांच्याकडे मागणी ■ संसदेबाहेर आंदोलन करीत खा. लंके यांनी वेधले लक्ष ■ भाव गडगडल्याने शेतकरी हवालदिल**





■ कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटविण्याची आग्रही मागणी खासदार नीलेश लंके यांनी वाणिज्य मंत्री पियुष गोयल, राज्यमंत्री जितिन प्रसाद यांच्याकडे शुक्रवारी केली. खा. लंके व खा. बजरंग सोनवणे यांनी संसदेबाहेर आंदोलन केले.

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

**देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तात्काळ हटविण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी शुक्रवारी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, राज्यमंत्री जितिन प्रसाद यांची भेट घेउन केली.**

खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली मंत्री पियुष गोयल यांना भेटलेल्या शिष्टमंडळात खासदार नीलेश लंके, बजरंग सोनवणे, खा. शोभा बच्छाव, खा. राजाभाउ वाझे, खा. गोवाल पाडवी, खा. वर्षा गायकवाड, खा. भास्कर भगरे, खा. मारूतीराव कोवासे यांचा समावेश होता. खा. लंके यांनी गोयल यांच्याशी संवाद साधत महाराष्ट्रातील कांदा उत्पादन तसेच भाव कोसळल्याने शेतकऱ्यांवर ओढावलेल्या संकटाबाबत चर्चा केली.

खासदार लंके यांनी गोयल यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील कांद्याला विदेशात मागणी असल्याने परदेशात मोठया प्रमाणावर महाराष्ट्रातील कांद्याची निर्यात केली जाते. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळत नाही. अगोदरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत आहे. असे असताना भारत सरकारने कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. त्यामुळे कांदा उत्पादकांना मोठे नुकसान सोसावे लागत आहे. या शुल्कामुळे कांद्याच्या निर्यातीवरही परिणाम होत असल्याचे खा. लंके यांनी या निवेदनात नमुद केले आहे.

महाराष्ट्रामध्ये उन्हाळी कांद्याचा साठा संपला असून राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये गुलाबी कांद्याची आवक होत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये बाजार समित्यांमध्ये कांद्याची मोठया प्रमाणावर आवक झाल्याने शेतकऱ्यांना दुहेरी मनस्ताप सहन करावा लागतो आहे. आगोदरच अवकाळी पाउस, बदलते हवामान यामुळे कांदा उत्पादनात आणि उत्पन्नातही घट आली आहे. तर दुसरीकडे त्यांना त्यांचा कांदा कमी दरात विकावा लागत असल्याचे खा. लंके यांनी मंत्री पियुष गोयल यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

### शेतकऱ्यांना दिलासा द्या

कांदा उत्पादकांचे हित लक्षात घेउन केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क हटवावे. जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल आणि त्यांच्या झालेल्या नुकसानीची भरपाई होऊ शकेल.

**खा. नीलेश लंके**
लोकसभा सदस्य

### गृहमंत्र्यांनी माफी मागावी

देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी वक्तव्य करून चुक केली आहे. या वक्तव्याविषयी त्यांनी माफी मागितली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घटना लिहिली, या घटनेच्या आधारेच देशातील सर्व गोष्टी चालत आहेत. डॉ. बाबासाहेब हे अर्थतज्ञ होते. एखाद्या अभ्यासू महापुरूषाविषयी वक्तव्य करून अवमान झाल्यानंतर निश्चितच माफी मागितली पाहिजे ही आमची मागणी आहे.

**खा. नीलेश लंके**, लोकसभा सदस्य

### संसदेबाहेर आंदोलन

मंत्री पियुष गोयल यांना निवेदन देण्यापूर्वी खा. नीलेश लंके व खा. बजरंग सोनवणे यांनी संसदेबाहेर आंदोलन करीत कांदा प्रश्नी लक्ष वेधले. कांद्यावरील निर्यात शुल्क उठवा, आमच्या शेतकऱ्यांना न्याय द्या अशा घोषणाबाजीही खा. लंके व खा. सोनवणे यांनी केली.

### राज्यमंत्री प्रसाद यांनाही निवेदन

केंद्रीय वाणिज्य राज्यमंत्री जितिन प्रसाद यांचीही खा. नीलेश लंके यांनी भेट घेऊन कांद्याचे भाव कोसळल्याने महाराष्ट्रातील कांदा उत्पादक शेतकरी अडचणीत सापडल्याचे निर्दशनास आणून दिले. वाणिज्य मंत्रालयाने कांदा निर्यातीवरील २० टक्के निर्यात शुल्क रद्द करण्याची मागणी लंके यांनी केली. जितिन प्रसाद यांनाही खा. लंके यांनी निवेदन सादर केले.

### शुल्क शुन्य केल्यावर भाव वाढतील

कांदा उत्पादक राज्य म्हणून महाराष्ट्राकडे पाहिले जाते. आज मितीस कांद्याचे दर मोठया प्रमाणावर ढासळले आहेत. वाणिज्य मंत्री पियुष गोयल यांची आम्ही महाराष्ट्रातील खासदारांनी खा. सुप्रियाताई सुळे यांच्या नेतृत्वाखाली भेट घेऊन कांदा निर्यातीवर लावण्यात आलेले २० टक्के शुल्क शुन्य करण्याची मागणी केली. निर्यात शुल्क शुन्य केल्यानंतर निर्यात वाढून कांद्याला चांगला दर मिळेल असेही मंत्री गोयल यांच्या निदर्शनास आणून दिल्याचे खा. लंके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

### उत्पादन खर्चाची तोंड मिळवणी होत नाही

आज कांद्याला दहा, बारा रूपये दर मिळत आहे. हा दर कांदा उत्पादक शेतकऱ्यांना परवडणारा नाही. त्यातून उत्पादन खर्चाची तोंड मिळवणीही होत नाही. त्यासाठीच आम्ही निर्यात शुल्क कमी करण्याची मागणी करत असल्याचे खा. लंके यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# संभाजी ब्रिगेड देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी

**| प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांचे प्रतिपादन | मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख कुटूंबियांची सांत्वनपर भेट**



**बीड : प्रतिनिधी**

**मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला. या खुनाचा मास्टरमाईड समाजासमोर येणे गरजेचे आहे. संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांना न्याय मळवून देण्यासाठी संभाजी ब्रिगेड यांच्या पाठीशी ठाम उभी राहणार असल्याचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे यांनी सांगितले.**

बीड जिल्हयातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटूंबियांची आखरे यांनी भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यांच्यासमवेत अहिल्यानगरचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे, प्रदेश उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, विभागीय अध्यक्ष राहुल वायकर, प्रदेश संघटक शशिकांत कन्हेरे, बीड शहर जिल्हाध्यक्ष विजय दराडे, जिल्हाध्यक्ष प्रविण ठोंबरे व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी बोलताना आखरे म्हणाले, सरपंच देशमुख यांनी स्वतः ला चळवळीत आणि लोकसेवेसाठी वाहून घेतले होते. सामाजिक सलोखा व बहुजन समाजाच्या हितासाठी त्यांनी मस्साजोग गाव विभाग स्तरावर गाजविले आहे. देशमुख यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे ते सलग तीनदा गावचे सरपंच होते.

ग्रामपंचायतीची सत्ता हाती आल्यानंतर त्यांनी गावाचा कायापालट करत विकास कामांचा सपाटा सुरू केला. सेवाभावी वृत्तीमुळे ग्रामपंचायतीस शासनाचे जिल्हा व विभाग स्तरावरील विविध पुरस्कार प्राप्त झाले आहेत. त्यांच्या मृत्यूने गावाच्या विकासाला खिळ बसण्याची शक्यता वर्तविली जात आहे. परंतु संभाजी ब्रिगेड देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी ठामपणे उभी राहून देशुमख कुटूंबियांना न्याय मिळवून देईल. या घटनेच्या मास्टरमाईडला समाजासमोर आणून बहुजन समाज एकसंघ राहिल या दृष्टीने आम्ही काम करू अशी ग्वाही त्यांनी दिली.

### बीडचा बिहार होऊ देणार नाही

देशमुख कुटूंबियांची भेट घेऊन सांत्वन करून भागणार नाही तर बीड जिल्हा हा दहशतमुक्त करून बीडचा बिहार होण्यापासून वाचविण्यासाठी संभाजी ब्रिगेड काम करेल. संभाजी ब्रिगेड ही एक वैचारीक व बहुजन समाजाची चळवळ आहे. विकृत व्यक्तीने केलेले कृत्य जाती-पाती न ओढता खून करणाऱ्या नराधमांना फाशीची शिक्षा होत नाही व खुनाचे सत्य बाहेर येत नाही, तोपर्यंत संभाजी ब्रिगेड देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी ठामपणे व सक्षमपणे उभी राहील.

**राजेश परकाळे**
जिल्हाध्यक्ष, अहिल्यानगर

### मास्टरमाईड तातडीने ताब्यात घ्या

मस्साजोगचे मा. सरपंच संतोष पंडितराव देशमुख यांच्या मारेकऱ्यांना तातडीने अटक करण्यात यावी आणि या प्रकरणाची पाळेमुळे शोधून आरोपींना कठोर शासन करावे अशी संभाजी ब्रिगेडची मागणी आहे. मस्सजोग येथील अमानुष घटन ही निंदनीय आहे. या घटनेचा मास्टरमाईड तातडीने ताब्यात घ्यावा व त्याला कडक शासन व्हावे यासाठी संभाजी ब्रिगेड पुर्ण ताकदीने देशमुख कुटूंबियांच्या पाठीशी उभी आहे.

**शशीकांत कन्हेरे**
प्रदेश संघटक

# अजितदादांच्या भेटीला शरद पवार गटाचे दोन नेते!

**पडद्यामागे काय घडतंय? राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण**



**नागपूर : प्रतिनिधी**

**राज्यात सध्या विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये विविध मुद्यांवरून आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. यातच महायुती सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार झाला असला तरी अद्याप खातेवाटप झालेले नाही. त्यामुळे अनेकांचे लक्ष खातेवाटपाकडे लागले आहे. असे असताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या काही नेत्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची भेट घेतली.**

दोन दिवसांपूर्वी शशिकांत शिंदे यांनी अजित पवारांची भेट घेतली होती. त्यानंतर आज आमदार रोहित पाटील आणिअनिल देशमुखयांचे पुत्र सलील देशमुख यांनी अजित पवारांची भेट घेतली. त्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आलं. राष्ट्रवादी शरद पवार गटात नेमकं चाललंय काय? याबाबत तर्कवितर्क लावले जात आहेत. दरम्यान, आता या भेटींवर आमदार रोहित पवार यांनी स्पष्टीकरण दिले आहे. 'बरेचसे आमदार काय? मी देखील अजित पवारांना भेटलो. ते सत्तेत आहेत त्यामुळे काही विकासाचे कामे मार्गी लावायचे असतात तर भेटावं लागते', असे स्पष्टीकरण रोहित पवार यांनी दिले आहे.

उर्वरीत पान ३ वर

# ताम्हिणी घाटात बस पलटी; पाच जणांचा मृत्यू

**३५ प्रवासी गंभीर जखमी | मृतांचा आकडा वाढण्याची भीती**



**पुणे : प्रतिनिधी**

**ताम्हिणी घाटात वॉटरफॉल पॉईटजवळ भीषण अपघात घडल्याची घटना उघडकीस आली आहे. एका प्रवासी ट्रॅव्हल्सचा ताबा सुटल्याने ती पलटी झाली असून, या दुर्घटनेत ५ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ३५ प्रवासी गंभीर जखमी झाले आहेत. ट्रॅव्हल्समध्ये काही प्रवासी अडकले असल्याची माहिती समोर आली आहे. ही ट्रॅव्हल्स चाकणवरून वीरवाडीला (महाड), लग्नाला चालली होती. या घटनेमुळे एक खळबळ उडाली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्यातील लोहगाव येथून जाधव कुटुंब हे महाड येथील बिरवाडी येथे बसमधून लग्नसमारंभासाठी खासगी बसने जात होते. ट्रॅव्हल्स खाजगी बस (क्रमांक. एमएच १४ जीयू ३४०५) ही रस्त्यावरून जात असताना ताम्हिणी घाटात वॉटरफॉल पॉईटजवळ धोकादायक वळणावर बस ड्रायव्हरचे नियंत्रण सुटले आणि बसचा भीषण अपघात झाला. ही गाडी पूर्णपणे पलटी झाली आणि पाच जणांचा मृत्यू झाला. त्यामध्ये २ पुरूष आणि ३ महिलांचा समावेश आहे.

संगीता धनंजय जाधव, गौरव अशोक दराडे, शिल्पा प्रदीप पवार आणि वंदना जाधव अशी मृतांची नावे असून पाचव्या मृत पुरूषाची ओळख अजून पटलेली नसल्याने त्याचे नाव जाहीर करण्यात आलेले नाही. अपघातात ३५ प्रवासी जखमी उर्वरीत पान ३ वर

# संजय राऊतांच्या घराची रेकी; दोन अज्ञात बाईकस्वार सीसीटीव्हीत कैद

**दिल्लीतील घराचीही रेकी केल्याचा दावा!**




**मुंबई : प्रतिनिधी**

**शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे राज्यसभा खासदार व मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांच्या घराची रेकी झाल्याचा धक्कादायक दावा समोर आला आहे. खुद्द संजय राऊत व त्यांचे बंधू सुनील राऊत यांनी हा दावा केला असून त्यानुसार पोलिसांकडून तपास केला जात आहे.**

सुनील राऊत यांनी घरातल्या सीसीटीव्हीचे फूटेज पोलिसांना सोपल्याचे सांगितले असून त्यात दोन बाईकस्वार स्पष्टपणे दिसत असल्याचे सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर आता राजकीय वर्तुळात या 'रेकी'ची चर्चा सुरू झाली असून ते दोन बाईकस्वार नेमके कोण होते? याचा तपास पोलीस घेत आहेत.

पत्रकारांनी संजय राऊतांना यासंदर्भात विचारणा केली असता त्यांनी त्याबाबत सविस्तर प्रतिक्रिया दिली. ''सामना कार्यालयाची रेकी होत आहे. माझ्या घराचीही होतेय. दिल्लीतल्या घराचीही रेकी झाल्याचे आता समजलेय. हे सगळं रेकॉर्डवर आहे. पोलीस अधिकारी तपास करत आहेत. उद्धव ठाकरेही पोलिसांशी बोलत आहेत. संतोष देशमुखांसारखे काही प्रकार आणखी उर्वरीत पान ३ वर



स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

## तंतुमय पदार्थांचे पशुआहारात महत्त्व

**तंतुमय पदार्थांमुळे जनावरांच्या पोटाची, आतड्याची योग्य हालचाल होऊन पचनसंस्थेची कार्यक्षमता वाढते. दुधातील फॅटचे प्रमाण वाढण्यास मदत होते. रक्तातील कोलेस्ट्रॉल व साखरेचे नियंत्रण करण्यास तंतुमय पदार्थ मदत करतात.**



जनावरांचे उत्तम आरोग्य, जलद वजनवाढ आणि मुबलक दूध उत्पादनासाठी सर्वात महत्त्वाचा घटक आहे तो म्हणजे जनावरांचा आहार. दैनंदिन आहारामध्ये कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, क्षार, जीवनसत्त्व यांचा कमी-जास्त प्रमाणात जनावरांच्या आहारात वापर होत असतो. कर्बोदकांमधील जलद पचणारा व शरीराला साखर व ऊर्जा पुरवणारा एक भाग असतो त्याला फायबर (तंतुमय पदार्थ) असे म्हणतात. या तंतुमय पदार्थांमध्ये सेल्युलोज, हेमीसेल्युलोज, लिग्नीन आदी घटक असतात. पशू शरीरामध्ये जसे कर्बोदके, प्रथिने, स्निग्ध पदार्थ, क्षार, आणि जीवनसत्त्वाचे कार्य असते, त्याच पद्धतीने पशुआहारामध्ये तंतूमय पदार्थांना महत्त्व आहे.

### तंतुमय पदार्थांचा पुरवठा


हिरवा चारा, वाळलेला चारा, चुन्नी, भुसा, धान्याचा कोंडा, टरफले, शेतातील दुय्यम पदार्थांमधून जनावरांना तंतुमय पदार्थांचा पुरवठा केला जातो. यामध्ये परिणामकारक तंतुमय पदार्थ असा एक तंतुमय पदार्थाचा भाग आहे. हे परिणामकारक तंतुमय पदार्थ विशेषतः लांब धाटाचे गवत योग्य स्थितीत वाळवून (हे बनवून) जनावरांना दिल्यास त्यातून पुरवठा केला जातो. तंतुमय पदार्थांमधील सेल्युलोज, हेमिसेल्युलोज यांचे पचन होऊ शकते. परंतु लिग्नीनचे पचन होत नाही. यामुळे निबर चारा, स्थितीच्या पुढे गेलेला चारा, जास्त दिवस शेतात राहून वाळणारा चारा यामध्ये लिग्नीनचे प्रमाण जास्त होऊन त्याची पचनक्षमता कमी होते. म्हणून उत्तम तंतुमय पदार्थ मिळविण्यासाठी चाऱ्याची कापणी योग्य स्थितीमध्ये करणे अत्यंत गरजेचे आहे.

### तंतुमय पदार्थाचे फायदे

- जनावरांच्या पोटाची, आतड्याची योग्य हालचाल होऊन पचनसंस्थेची कार्यक्षमता वाढते.
- जनावरांचे पोट गच्च होणे, पोटफुगी टाळली जाते.
- तंतुमय पदार्थ पोटातील पाणी शोषून घेऊन फुगतात. यामुळे जनावरांना पोट भरल्याचे समाधान मिळते.
- जनावरांची पाणी पिण्याची क्षमता वाढते.
- दुधातील फॅटचे प्रमाण वाढण्यास मदत होते.
- जनावरांची स्वयंक्रिया उत्तम राहते.
- जनावरांचे पोट साफ होण्यास मदत होते.
- जनावरांतील स्थूलपणा कमी करण्यास मदत होते.
- रक्तातील कोलेस्ट्रॉल व साखरेचे नियंत्रण करण्यास तंतुमय पदार्थ मदत करतात.
- जनावरांची चर्वण क्षमता उत्तम राहते. लाळ जास्त प्रमाणात तयार होऊन ती चाऱ्यामध्ये मिसळली जाते. यामुळे कोटीपोटातील सामू टिकून राहण्यास मदत होते.
- पोटाची व आतड्याची शोषणक्षमता उत्तम राहते.
- कोटीपोटातील, आतड्यातील उपयुक्त जीवजंतुच्या वाढीसाठी पोषक वातावरण तयार करतात.
- कोटीपोटातील तयार होणाऱ्या व्होलाटाईल फॅटी ॲसिडचे प्रमाण नियंत्रित करण्यास मदत करते.
- जनावरांतील चारा खाण्याचे प्रमाण नियंत्रित केले जाते.

### तंतुमय पदार्थांची उपयोगिता वाढविण्यासाठी...

- चाऱ्याची कुटी एकदम बारीक न करता १ ते २ इंच आकाराची करावी. एकदम लहान तुकडे केल्यास तंतूमय घटकांची उपयुक्तता कमी होते.



- जनावरांच्या आहारात लांब धाट असलेला चारा योग्य स्थितीत वाळवून द्यावा.
- शेतातील दुय्यम पदार्थावर, युरिया, मळी अथवा गूळ, क्षारमिश्रण, वाफ, सोडियम हायड्रॉक्साईड, अमोनियम हायड्रॉक्साईडची योग्य प्रमाणात प्रक्रिया करावी.
- जनावरांच्या दैनंदिन आहारामध्ये वाळलेला चाऱ्याचा योग्य प्रमाणात 'टोटल मिक्स राशन' पदधतीने वापर करावा.
- वाळलेला चारा, पशुखाद्य वापरून संतुलित संपूर्ण खाद्य गोळीपेंड तयार करावी.
- वाळलेला चारा, पशुखाद्य यांचे ब्लॉक्स तयार करावेत.
- जनावरांना पिण्यास मुबलक पाणी उपलब्ध करून द्यावे.
- जनावरांच्या आहारात केवळ वाळलेला चाराकिंवा हिरव्या चाऱ्याचा वापर न करता दोन्हीचे मिश्रण द्यावे.



## जनावरांत दिसतो थंडीचा ताणतणाव

**अचानक तापमान खूप कमी झाले तर जनावरे थंडीपासून निर्माण होणाऱ्या ताणतणावाला (कोल्ड स्ट्रेस) सामोरे जातात. यासाठी जनावरांद्वारे चयापचय प्रक्रियांचा वेग वाढविणे गरजेचे आहे. योग्य आहार आणि इतर व्यवस्थापनातून थंडीमुळे होणारा ताणतणाव कमी करता येतो. गाई, म्हशी आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित ठेवतात. साधारणपणे गायीच्या शरीराचे तापमान ३८ अंश सेल्सिअस असते. तापमान सर्वसाधारण असताना शारीरिक तापमान नियंत्रणासाठी जनावरांना अधिकची ऊर्जा खर्ची होत नाही. यापेक्षा कमी तापमान झाल्यास चयापचय प्रक्रियांद्वारे निर्माण झालेली ऊर्जा शरीरासाठी वापरली जाते. या अवस्थेमध्ये जनावरे थंड हवेपासून वाचण्यासाठी निवाऱ्याचे ठिकाण शोधतात. अचानक तापमान खूप कमी झाले तर जनावरे थंडीपासून निर्माण होणाऱ्या ताण तणावाला (कोल्ड स्ट्रेस) सामोरे जातात. यासाठी जनावरांद्वारे चयापचय प्रक्रियांचा वेग वाढविणे गरजेचे ठरते, यामुळे शरीराला अतिरिक्त प्रमाणात ऊर्जा मिळते. एकाच ठिकाणी थांबलेल्या थंड हवेपेक्षा सतत वाहत असणाऱ्या वाऱ्यामुळे शरीरातील उष्मा किंवा ऊर्जा काढून घेतली जाते. शरीराच्या व्यवस्थापनासाठी तसेच उत्पादनासाठी जास्त ऊर्जेची गरज भासू लागते. योग्य आहार आणि इतर व्यवस्थापन केले असता जनावरांमधील थंडीमुळे होणारा ताणतणाव कमी होतो.**

### थंड वातावरणात शरीराचे कार्य

- रक्तवाहिन्या आकुंचन पावतात.
- ग्रंथींद्वारे कमी प्रमाणात घाम निघतो.
- केसांद्वारे उष्माची बचत.
- स्नायूंची कार्यक्षमता वाढते.
- जनावरे एकत्रित येऊन समूहामध्ये जमा होतात.
- शरीरात निर्माण होणारी ऊर्जा (उष्मा) ही उत्सर्जित होणाऱ्या ऊर्जेपेक्षा जास्त असते.

### ताणतणावाची कारणे...


- थंड वातावरण, शरीरावरील केसांचे कमी प्रमाण.
- निवाऱ्याची अयोग्य सोय.
- बॉडी कंडिशन स्कोअर (प्रकृती अंक) कमी होणे.
- पोषक घटकांची पूर्तता न होणे, खाद्य व पाणी कमी पिणे.
- कमी शुष्क पदार्थांचे सेवन, वासरांची अयोग्य निगा.
- गोठ्याचे अयोग्य व्यवस्थापन. संक्रमण काळातील जनावरे.
- आहारामध्ये खाद्यपूरकांचा कमी समावेश.
- रूमेनमधील अंतर्गत वातावरणातील बदल.
- जनावरे शॉकमध्ये जाणे, हायपोकॅल्शेमिया.

### ताणतणाव निर्माण होण्याचा प्रकार

शरीरात निर्माण होणारी ऊर्जा (उष्मा) ही उत्सर्जित होणाऱ्या ऊर्जेपेक्षा कमी असते. यामुळे हायपोथर्मिया निर्माण होतो. चेतासंस्थेची कार्यक्षमता मंदावते. रक्तवाहिन्या अधिक प्रमाणात प्रसरण पावतात. यामुळे शरीराचे तापमान अजून कमी होते. परिणाम गाईमध्ये सौम्य, मध्यम आणि तीव्र स्वरूपाचा हायपोथर्मिया.

- सौम्य : ३० ते ३२ अंश सेल्सिअस (८६ ते ८९ फॅरानाईट)
- मध्यम : २२ ते २९ अंश सेल्सिअस (७१ ते ८५ फॅरानाईट)
- तीव्र : २० अंश सेल्सिअस पेक्षा कमी (६८ फॅरानाईट)

शरीराचे तापमान २८ अंश सेल्सिअसपेक्षा खाली गेले असता, जनावरांना बाहेरून फ्लुइड थेरपी देणे गरजेचे असते. त्याशिवाय ते साधारण तापमान नियंत्रित ठेऊ शकत नाहीत. तापमान अजून कमी झाले असता चयापचय आणि शारीरिक प्रक्रियांचा वेग मंदावतो. शरीराच्या सर्व बाह्य भागापासून रक्त अंतर्गत महत्त्वाच्या अवयवांपर्यंत पोहचवले जाते.



### प्रकृती अंकावर परिणाम

प्रकृती अंकाचा (BCS) थेट संबंध शरीरामधील फॅट किंवा चरबीसोबत असतो. फॅटमध्ये इन्सुलेटिव्ह गुणधर्म असल्याने आपले जनावर थंडीच्या तणावाला सामोरे जात आहे की, नाही हे ओळखण्यास मदत होते. संक्रमण काळातील गाई-म्हशी विल्यानंतर दूध उत्पादनासाठी शरीरातील फॅटचा वापर करतात. ज्यामुळे अशी जनावरे कोल्ड स्ट्रेसला लवकर बळी पडतात. तसेच यासाठी खुरांमधील फॅटचा देखील वापर केला जातो. ज्याचा उपयोग जनावरांना सर्वसाधारण उभे राहण्यासाठी होतो. याप्रकारे फॅट कमी झाले असता जनावरे एकाच ठिकाणी उभी राहून खाद्य, पाण्यापासून वंचित राहू शकतात.

- नितेज व थंड त्वचा, खाद्याचे सेवन कमी, दुग्धोत्पादन घट
- वाढती हृदय गती, श्वास घेण्यासाठी त्रास.
- स्नायू आखडतात, त्वचेला भेगा पडतात
- अति ताणामध्ये जनावरे मृत्युमुखी पडतात.



### गोठा व्यवस्थापन

- जास्त वॅट्स असणाऱ्या बल्बचा वापर.
- गोठ्यातील जमिनीवर भात, गव्हाचे काड तसेच भुसा वापरावा.त्यामुळे जनावरांचे थंडीपासून संरक्षण होईल.
- गोठा नेहमी स्वच्छ ठेवावा. छप्परावर इन्सुलेटिंग मटेरिअल वापरावे.
- गोठ्याच्या दोन्ही बाजू गोणपाट किंवा ताडपत्रीने झाकाव्यात.
- जनावरे, वासरांचे शरीर झाकावे.
- गोठ्यामध्ये काही काळ हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.
- गोठ्यात पुरेसा सूर्यप्रकाश आत येईल अशी व्यवस्था करावी.
- गोठा रोज धुण्यापेक्षा शक्य तिथे चुन्याचा वापर करावा.

### थंडीपासून संरक्षण



### इतर व्यवस्थापन

- वातावरणातील तापमान बदलावर लक्ष ठेऊन जनावरांचे तापमान तपासावे.
- ज्या जनावरांच्या शरीरावर केसांचे आच्छादन कमी आहे, त्यांची काळजी घ्यावी.
- जनावरांना एकाच ठिकाणी बांधून न ठेवता त्यांना बाहेर सूर्यप्रकाशात चालवावे. जेणेकरून शरीराची हालचाल, व्यायाम होण्यास मदत होते.
- गाई, म्हशींना स्वच्छ ठेवावे. हिवाळ्यामध्ये जनावरांना भादरू नये.
- व्यवस्थित पान्हा सोडण्यासाठी, कास आणि वासरांना धुण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करावा.
- जनावरांच्या शरीरावरून ब्रश फिरवला असता रक्ताभिसरण सुरळीत होते.

### आहार व्यवस्थापन

- गर्भधारणेच्या शेवटच्या तीन महिन्यांत जास्त उर्जायुक्त आहार द्यावा.
- संक्रमण काळात गाई-म्हशी आणि वासरांच्या आहारावर योग्य लक्ष द्यावे.
- आहारातील ऊर्जेची घनता वाढवावी.
- साधारणतः दुपारी किंवा संध्याकाळी खाद्य द्यावे. यामुळे ६ ते ८ तासांनंतर शरीरात जास्त उष्मा (ऊर्जा) निर्माण होण्यास मदत होते, जेव्हा वातावरणातील तापमान कमी असते.
- स्वच्छ व मुबलक पाणी उपलब्ध करून दिल्याने खाद्याचे सेवन वाढते.
- रूमेनमधील किण्वन प्रक्रिया योग्य प्रकारे चालू राहण्यासाठी तसेच सामू नियंत्रित ठेवण्यासाठी योग्य खाद्यपूरकांचा वापर करावा.
- खाद्य किंवा पाण्यामधून खनिजे व जीवनसत्त्वे द्यावीत. जनावरांना योग्य प्रमाणात इलेक्ट्रोलाइट्स मिळाल्यामुळे डीहायड्रेशनचा धोका होत नाही.
- आहारातील खाद्य घटकांचा आकार योग्य असावा. असे नसल्यास जास्त ऊर्जा जनावरांद्वारे चर्वण करण्यात वाया घालवली जाते.
- सहज पचण्याजोगी कर्बोदके आहारात वापरल्यामुळे ऊर्जा लवकर मिळण्यास मदत होईल.
- जनावरांच्या आहारात बायपास फॅटचा वापर करावा.
- आहारामध्ये योग्य त्या प्रमाणात उसाची मळी किंवा गुळाचा वापर करावा. यातून ऊर्जा तसेच कॅल्शिअम मिळण्यास मदत होईल.
- पचन संस्था तसेच पचन प्रक्रिया व्यवस्थित राहील याची काळजी घ्यावी.
- वासरांमध्ये जन्मतः कमी फॅट आणि रूमेनची अकार्यक्षमता असल्या कारणाने ऊर्जेची निर्मिती कमी प्रमाणात होते. यासाठी योग्य त्या वेळेस काफ स्टार्टर आणि मिल्क रिप्लेसरचा वापर करावा.
- असिडोसिस टाळण्यासाठी सोडियम बायकार्बोनेटचा वापर करावा.
- मंदावलेली पचन प्रक्रिया सुधारण्यासाठी यीस्ट सप्लिमेंटचा वापर करावा.
- सुक्या चाऱ्याचा आहारामध्ये समावेश करावा.

## गव्हात आंतरमशागत, पाणी व्यवस्थापन

**भारी जमिनीतील गहू पिकाला १८ दिवसांच्या अंतराने ६ पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. मध्यम जमिनीसाठी १५ दिवसांच्या अंतराने ७ पाळ्या द्याव्यात. हलक्या जमिनीस १० ते १२ दिवसांच्या अंतराने ८ ते १० पाळ्या द्याव्यात. परंतु पीक वाढीच्या महत्त्वाच्या अवस्था आणि या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास उत्पादनावर परिणाम होतो.**

- मुकुटमुळे फुटण्याच्या वेळी (पेरणीनंतर २१-२५ दिवसांनी) : या वेळी जमिनीत पाण्याची उपलब्धता कमी असल्यामुळे मुकुटमुळे कमी फुटतात. फुटलेल्या मुळ्या जास्त पसरत नाहीत.फुटवे कमी येतात.गहू काढणीस लवकर येतो.उत्पादनात घट येते.
- फुटवे फुटण्याची अवस्था (पेरणी नंतर ५५-६० दिवसांनी) : ओंब्या कमी बाहेर पडतात. बाहेर पडलेल्या ओब्यांची लांबी कमी होते. पर्यायाने उत्पादनात घट येते.
- पीक फुलोऱ्यास येणे (पेरणी नंतर ७०-८० दिवसांनी) : परागसिंचन कमी होऊन दाण्याची संख्या घटते. पर्यायाने उत्पादन घटते.
- दाण्यात चीक भरण्याची वेळ (पेरणीनंतर ९०-१०० दिवसांनी) : या अवस्थेत दाणे पोसतात,त्यांचा आकार वाढतो.परंतु जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार लहान होतो, वजन कमी होते.
- दाणे टणक होण्याची अवस्था (पेरणी नंतर ११० दिवसांनी) : या अवस्थेत जमिनीत ओलावा कमी असल्यास दाण्याचा आकार कमी होतो. दाण्यांवर सुरकुत्या पडून प्रत निकृष्ट होते. पर्यायाने उत्पादनात घट येते.
- ज्या शेतकऱ्यांकडे मुबलक प्रमाणात पाणी उपलब्ध नाही अशा परिस्थितीत पाण्याचे योग्य नियोजन करणे अत्यंत गरजेचे आहे.

### पाणी अपुरे असल्यास व एक ते पाच पाण्याच्या पाळ्या देणे शक्य असल्यास...

- एकाच पाणी देणे शक्य असल्यास ते पेरणीनंतर २१-२५ दिवसांनी द्यावे.
- दोन पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी पेरणीनंतर २१ ते २५ दिवसांनी व दुसरे ५५-६० दिवसांनी द्यावे.
- तीन पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी २१ ते २५ दिवसांनी, दुसरे ५५-६० दिवसांनी तर तिसरे ७०-८० दिवसांनी द्यावे.
- चार पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी २१ ते २५ दिवसांनी, दुसरे ५५-६० दिवसांनी, तर तिसरे ७०-८० दिवसांनी द्यावे. चौथे पाणी ९०-१०० दिवसांनी द्यावे.
- पाच पाणी देणे शक्य असल्यास पहिले पाणी २१ ते २५ दिवसांनी, दुसरे ४०-४५ दिवसांनी, तर तिसरे ५५-६० दिवसांनी, चौथे पाणी ७०-८० दिवसांनी, तर पाचवे ९०-१०० दिवसांनी द्यावे.

### आंतरमशागत

पेरणीनंतर २१-३० दिवसांनी एक खुरपणी आणि कोळपणी करून तणनियंत्रण करावे. गव्हात चांदवेल, हराळी यांसारख्या तणांचा प्रादुर्भाव होतो. त्याकरिता जरुरी प्रमाणे एक किंवा दोन खुरपणी, तसेच कोळपणी करून जमीन मोकळी करावी. आंतरमशागती मुळे तणांचा नाश होतो व जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होते.



बागायती वेळेवर पेरलेल्या गव्हास खुरपणी झाल्यानंतर (सर्वसाधारणपणे २१-३० दिवसांनी) प्रति हेक्टरी ६० किलो नत्र (१३० किलो युरिया), बागायती उशिरा पेरलेल्या गव्हास प्रति हेक्टरी ४० किलो नत्र (८७ किलो युरिया) द्यावा. पीक ५५ ते ७० दिवसांचे असताना १९:१९:१९ या विद्राव्य खताची दोन टक्के या प्रमाणे दोन वेळा फवारणी करावी. (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम १९:१९:१९) दाणे भरण्याच्या अवस्थेत दोन टक्के युरियाची फवारणी करावी. (१० लिटर पाण्यात २०० ग्रॅम युरिया)

## शॉर्ट न्यूज

### संगमनेरमध्ये गंठण चोरांनी घातला धुमाकूळ

■ **संगमनेर :** शहरातील हायटेक बसस्थानक, हमरस्ते, उपनगर आणि ग्रामीण भागातही गंठण चोरांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. त्यामुळे महिलांनी घराबाहेर पडावे की नाही असा प्रश्न पडला आहे. दोन दिवसांपूर्वी भरदुपारी एसटी बसमध्ये चढत असताना दोन महिलांचे सतरा तोळे सोन्याचे दागिने व रोख रक्कम चोरून चोरट्यांनी पोबारा केला आहे. त्यातच पोलिसांना तपास लावण्यात यश मिळत नसल्याने नागरिकांतून संताप व्यक्त होत आहे. गेल्या अनेक दिवसांपासून गंठण चोरांनी संगमनेर शहर चांगलेच लक्ष्य केले आहे.

### शेअर मार्केटच्या नावाखाली ३३ लाखांना गंडा

■ **शेवगाव :** जादा परताव्याचे आमिष दाखवून शेअर मार्केटच्या नावाखाली अनेकांना तब्बल ३३ लाख ५० हजार रुपयांचा गंडा घालणाऱ्या संशयित आरोपींना शेवगाव पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल झाल्यानंतर काही तासांतच सापळा लावून जेरबंद केले. अवधूत विनायक केदार यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सखाराम नामदेव ढोरकुले फ्रान्सिस सुधाकर मगर या संशयित आरोपींना अटक करण्यात आली आहे.

### अवैधरित्या वाळू वाहतुकीवर कारवाइ

■ **नेवासा :** अवैधरित्या वाळू वाहतूक करणाऱ्यांवर स्थानिक गुन्हे शाखेने छापेमारी करत कारवाई केली. चांदा येथे विशाल लहु सोनवणे रा. लांडेवाडी हा ४ हजार रुपये किमतीची १ ब्रास वाळू बोलेरो पिकअप मध्ये विनापरवाना बेकायदारितीने वाहतूक करताना मिळून आला. त्याच्याकडून पोलिसांनी १६ लाख ५० हजार रुपये किंमतीचे वाहन तसेच ४ हजार रुपयांची वाळू असा एकूण १६ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. पोहेकॉ ज्ञानेश्वर शिंदे यांच्या फिर्यादीवरून बीएनएसचे कलम ३०३ (२) सह पर्यावरण कायदा कलम ३/१५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### शासकीय कार्यालयात दलालांचा बाजार

■ **अकोले :** शासकीय कार्यालयात वाढलेला दलालांचा वावर सर्वसामान्य नागरिकांसाठी चांगलीच डोकेदुखी ठरला आहे. विविध कामांसाठी आर्थिक पिळवणूक होत असल्याच्या तक्रारी आहेत. सावजाच्या शोधात दलाल जागोजागी दिसत असतानाही संबंधित कार्यालयाच्या अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले जात आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांनी या दलालांचा बंदोबस्त करून नागरिकांची लूट थांबवावी, अशी मागणी होताना दिसत आहे. येथील तहसील कार्यालयात शहरासह ग्रामीण भागातील नागरिक विविध कामे घेऊन येतात.

### पेन्शनर मेळाव्यात विविध प्रश्नी चर्चा

■ **श्रीगोंदा :** तालुका पेन्शनर असोसिएशनने एकमेकांच्या भावनांचा आदर करीत सामाजिक जाणिवेतून जीवनाचा आनंद लुटण्याचा संकल्प जागतिक निवृत्त कर्मचारी दिवसाचे औचित्य साधून केली. काष्टी येथे पेन्शनर अधिकारी, कर्मचाऱ्यांचा स्नेहमेळावा संपन्न झाला. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी अनिल शिंदे होते. संजय कळमकर म्हणाले की, पेन्शनरबांधवांच्या जीवनात अनेक समस्या आहेत. या समस्या पैशाने दूर होणाऱ्या नाहीत. त्यासाठी आपण एकमेकांशी स्नेह आणि मैत्रीचे नाते द्विगुणित करून जीवनात चैतन्य निर्माण करण्याची गरज आहे.

# थंडीपासून बचावासाठी दक्षता घ्या

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाचे आवाहन

**नगर : प्रतिनिधी**

**जिल्ह्यात सध्या कडाक्याची थंडी जाणवत असून तापमान वारंवार १० अंश सेल्सिअसच्या खाली घसरत आहे. आगामी काळातही थंडीची लाट कायम राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांनी थंडीपासून बचावासाठी आवश्यक ती काळजी घ्यावी, असे आवाहन प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी तसेच जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी शाहूराज मोरे यांनी केले आहे.**



थंडीच्या लाटेबाबत स्थानिक हवामान अंदाज रेडिओ, टीव्ही व वर्तमानपत्रांद्वारे नियमित तपासावा. नागरिकांनी स्वेटर, मफलर, कानटोपी, हातमोजे, पायमोजे तसेच चादर यांसारखे पुरेसे उबदार कपडे वापरावेत. शक्यतो थंड वाऱ्यात बाहेर जाणे टाळावे व शरीर कोरडे ठेवावे. शरीर ओले झाल्यास त्वरीत कपडे बदलून शरीरातील उष्णता टिकवावी. निरोगी अन्न, विशेषतः व्हिटॅमिन सीयुक्त फळे व भाज्यांचा आहारात समावेश करावा. शरीरातील उष्णता टिकवण्यासाठी गरम पेय किंवा द्रव्यांचे नियमित सेवन करावे.

लहान मुले, वृद्ध व्यक्ती यांची विशेष काळजी घ्यावी. थंडीत दीर्घकाळ राहिल्यास त्वचेवर निस्तेजपणा किंवा बधीरता जाणवू शकते. अशा लक्षणांकडे दुर्लक्ष न करता त्वरीत डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. थंडीमुळे थरकाप जाणवल्यास तातडीने उबदार ठिकाणी जावे. पशुधन आणि पाळीव प्राण्यांना सुरक्षित ठिकाणी हलवून त्यांचे थंडीपासून संरक्षण करावे.

आपत्कालीन परिस्थितीत प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे आणि आवश्यक असल्यास नजीकचे आरोग्य केंद्र, रुग्णालय किंवा १०८ टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. मोरे यांनी केले आहे

# मुंबई महापालिका अधिकाऱ्याला लाचप्रकरणी अटक

## ७५ लाखांची केली होती मागणी | लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

**मुंबई महानगर पालिकेच्या एका अधिकाऱ्याला ७५ लाखांची लाच स्वीकारल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अटक केली आहे. पालिकेच्याईस्ट वॉर्डमधील पद निर्देशित अधिकाऱ्याने ही लाच घेतली असून मंदार तारी असे त्यांचे नाव आहे. महापालिकेत लाच घेताना सापडल्याने मात्र सर्वांच्याच भुवया उंचावल्या गेल्या आहेत.**

अंधेरी येथील एका प्लॉटचे बांधकाम न तोडण्यासाठी अधिकाऱ्याने तक्रारदाराकडे २ कोटींची मागणी केली होती. मात्र लाच देण्यास तयार नसल्याने तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली. त्यानंतर तारी यांनी एका खासगी व्यक्तीला लाचेचा पहिला हप्ता म्हणून ७५ लाख स्वीकारण्यास सांगून स्वतः पळ काढला होता, अशी माहिती पोलिसांनी दिली आहे. यानंतर या रकमेचा गैरलाभ घेण्यासाठी तारी यांनी प्रयत्न केला आणि खासगी व्यक्तीकडून तारी यांनी ७५ लाख स्वीकारले आणि यावेळी २ खासगी व्यक्तींना पोलिसांनी अटक केली. तेव्हापासून तारी फरार होते.



अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी तारी यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, मुंबई उच्च न्यायालयाने त्यांची जामीनाची याचिका फेटाळून लावली होती. या सगळ्या प्रयत्नांनंतर तारी हे आज पोलिसांसमोर हजर झाले. पोलिसांनी या लाच प्रकरणी तिघांना अटक केली असून पुढील कारवाई करण्यात येत आहे.

# प्रत्येकाने ज्ञान मिळवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगावी - रमाकांत कुलकर्णी

## सीताराम सारडा विद्यालयात स्नेहसंमेलन

**नगर : प्रतिनिधी**



**जशी जशी नवीन पिढी बदलते. तसे नवीन पिढीतील ज्ञान वाढत आहे. विद्यार्थ्यांनी हा विषय अवघड आहे, हे शिकून मला पुढे काय फायदा होईल हा विचार ज्ञानापासून लांब नेतो. प्रत्येकाने आपली शाळा,आपले शिक्षक यांचे आभार मानायला हवेत.ज्याप्रमाणे संगीतकार व गायक दररोज रियाज करून सुंदर गाणे गातात. त्याचप्रमाणे प्रत्येकाने दिलेल्या अभ्यासाचा सराव करावा.प्रत्येकाने ज्ञान मिळवण्याची महत्वाकांक्षा बाळगावी, असे प्रतिपादन पुणे येथील उद्योजक रमाकांत कुलकर्णी यांनी केले.**

सीताराम सारडा विद्यालयात स्नेहसंमेलन व वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माया कुलकर्णी, मिलिंद गंधे,स्वाती गुंदेचा, अजित बोरा, सुमतीलाल कोठारी, जगदीश झालानी, डॉ.पारस कोठारी, विष्णू सारडा आदी उपस्थित होते.

उद्योजक गंधे म्हणाले,पालकांनी विद्यार्थ्यांना मोबाईल पासून दूर ठेवावे. मोबाईलमुळे मित्र,मैत्रिणी व पालक व विद्यार्थी यांच्यामधील संवाद कमी होत आहे.ऑस्ट्रेलियाने १६ वर्षाखालील मुलांना मोबाईल वापरण्याची बंदी हा नियम केला आहे. मोबाईलमुळे जग जवळ आले आहे पण मोबाईल मधून आपण काय शिकावे?. हे विचार करणे गरजेचे आहे.विद्यार्थ्यांनी जागृत होऊन टीव्ही व मोबाईल पासून दूर राहावे.

स्वाती गुंदेचा म्हणाल्या, आनंदी विचार असेल तर आयुष्य सुंदर बनते. सकारात्मक विचार ठेवले तर चांगल्या गोष्टी घडतात. आयुष्यात जगत असताना प्रत्येकाने माणूस म्हणून जगले पाहिजे. सीए अशोक गुजर म्हणाले, मुलांपेक्षा मुली काळजीपूर्वक शिक्षण घेत आहेत. महाराष्ट्रीयन मुले इंग्रजी बोलता येत नाही म्हणून मागे पडतात. दररोज इंग्रजी बोलण्याचा सराव केल्यास विद्यार्थी जीवनात यशस्वी होतील.

**वाचकांच्या लेखणीतून**

# आईची माया



आमच्या व्हाट्सअप ग्रुपवर एक चित्र दिले होते. सूर्याच्या कडक उन्हात भर रस्त्यात एक गाय उभी असून तिच्या सावलीला तिचे वासरू बसलेले दाखविले होते. त्यावरून चार चरणांची एक कविता तयार करायची होती. मी कविता तयार केली होती.

कडक ऊन्ह लागले पसरू
गायीच्या सावलीला बसले
वासरू
आईची माया, गायीची छाया
कधीच नाही जाणार वाया

आपल्या लहान मुलाला आंघोळपांघोळ घालून छान छान वस्त्रे घालावीत. दागदागिने घालून नटववावे, सजवावे आणि शेवटी गालावर काजळाची तीट काढावी. असे प्रत्येक आईला वाटत असते. रामायणाच्या बालकाण्डात वाल्मिकींनी श्रीरामाच्या बालपणाचे केलेले वर्णन पहा. कुणी गोविंद घ्या, कुणी गोपाळ घ्या असे श्रीकृष्णचरित्रात त्याच्या बालपणाचे केले गेलेले वर्णन पहा. वात्सल्य रस नुसता ओसंडून वाहत आहे! मग ती आई राजघराण्यातील असो वा गरिबाच्या झोपडीतील. तिच्या मायेचा पोत सारखाच!

माझी आईसुद्धा मला लहानपणी अशीच नटवीतसजवीत असावी. मी शाळेत जाऊ लागलो तरी माझ्या कानात सोन्याच्या बाळ्या, गळ्यात चांदीची सरी, कमरेला चांदीची साखळी आणि पायात तांब्याचे वाळे होते. खरे म्हणजे शाळकरी मुलांच्या अंगावर अशा किमती वस्तू असू नयेत. असा नियम असतो. पण साठेक वर्षांपूर्वीचा हा काळ असल्याने निदान ग्रामीण भागातील तत्कालीन शाळा हे एवढे मनावर घेत नसाव्यात. असे वाटते.

पुढे मी जेव्हा तिसरी वा चौथीच्या वर्गात गेलो तेव्हा आमच्या गुरुजींनी मला एक दिवस सांगितले, या बाळ्या, सरी, साखळी, वाळे घालणे बंद कर. आता तू मोठा झालास.

दुसऱ्या दिवसापासून माझ्या आईने माझ्या अंगावरचा हा सगळा साज उतरवून ठेवला! दोनतीन दिवस मला सुने सुने वाटले. आईला काय वाटले असेल? शेवटी आईची माया म्हणतात ती हीच नव्हे का?

**नाना ढवळे**
८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर,**
**जि. अहमदनगर.**

(पान १ वरून)

### अजितदादांच्या भेटीला शरद पवार गटाचे दोन नेते!

राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या काही आमदारांनीअजित पवारयांची भेट घेतल्याच्या पार्श्वभूमीवर बोलताना रोहित पवार म्हणाले, ''बरेचसे आमदार काय? काल मी देखील अजित पवार यांना भेटलो. आता अजित पवार सत्तेत आहेत, ते उपमुख्यमंत्री आहेत. मग असे काही विषय असतात ते राजकीय नसतात पण विकासाचे असतात. ते विषय मार्गी लावायचे असतील तर मग सत्तेत असणाऱ्या लोकांना आपल्याला भेटावं लागते'', असे रोहित पवार यांनी म्हटले.

''आता मी मुख्यमंत्रीदेवेंद्र फडणवीसयांना काल भेटलो. समजा उद्या पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळ दिली तर त्यांच्याकडे आम्ही मतदारसंघाचे काही विषय किंवा राज्याचे काही विषय मांडू शकतो. त्यामध्ये राजकारण केले नाही पाहिजे. आज दुर्दैवाने राजकारण केले जाते. आम्ही विरोधात असलो तरी मतदारसंघासाठी प्रयत्न करावे लागतात. त्याची वेगळी चर्चा होणं योग्य नाही. अजून पाच वर्ष त्यांच्याकडे २२२ आमदार आहेत, त्यामुळे आमच्या सारख्यांची गरज त्यांना असेल असं वाटत नाही'', असे रोहित पवार यांनी म्हटले आहे.

### ताम्हिणी घाटात बस पलटी; पाच जणांचा मृत्यू

असून काही जण बसमध्येही अडकले आहेत. मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

या अपघाताची माहिती मिळताच माणगाव पोलीस निरीक्षक निवृत्ती बोराडे यांनी त्यांच्या टीमसह घटनास्थळी धाव घेतली. बचावकार्य तातडीने सुरू करण्यात आले असून पोलीस, रेस्क्यू टीम, आणि वैद्यकीय मदत घटनास्थळी दाखल झाली आहे. जखमींवर माणगावच्या ग्रामीण रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांकडून या अपघाताप्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

**नेमकं काय घडलं?**

रायगडच्या ताम्हिणी घाटात एका खासगी बसचा अपघात झाला. या अपघातात बसमधील काही प्रवासी जखमी झाल्याची माहिती मिळते. पुण्यावरून रायगडच्या दिशेकडे येत असताना ताम्हिणी घाटातील तीव्र वळणावर ही बस कलंडली आणि अपघात घडल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. एकूण ४५ प्रवासी बसमधून प्रवास करत होते. त्यामधील बरेचसे प्रवासी जखमी असल्याची माहिती मिळतेय. काही प्रवासी बसखाली अडकून पडल्यानं त्यांना बाहेर काढण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत.

### संजय राऊतांच्या घराची रेकी; दोन अज्ञात बाईकस्वार सीसीटीव्हीत कैद

काही लोकांना करायचे असू शकतात. बघू. महाराष्ट्रात कायदा व सुव्यवस्था अजिबात राहिलेली नाही'', असेसंजय राऊतम्हणाले.

सकाळी नऊच्या सुमारास हा प्रकार घडल्याची माहिती समोर आली आहे. दोन इसम दुचाकीवर येऊन गेटजवळ थांबल्याचे सीसीटीव्ही फूटेजमध्ये दिसत आहे. घराजवळ येऊन थोड्या वेळाने पुन्हा यू टर्न घेऊन ते माघारी गेले. यात बाईक चालवणाऱ्याने हेलमेट घातले असून मागे बसलेल्या व्यक्तीने हुडीचे जॅकेट घातल्याचे दिसत आहे.

सुनील राऊत यावेळी घरातच होते असे सांगितले जात आहे. त्यांनी यासंदर्भात सविस्तर माहिती दिली आहे. ''मोबाईलने ते शूटिंग करत होते. त्यांना हटकल्यानंतर ते दोघे माघारी फिरून पळून गेले. माझ्या घरच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात ही दृश्य कैद झाली आहेत. हे वातावरण अत्यंत संशयित आहे. माझ्या घराला दोन गेट आहेत. पुढच्या गेटनंतर ते लोक मागच्या गेटवरही गेले. त्यांच्या मनात काहीतरी वाईट हेतू असावा. मुंबईत बाबा सिद्दिकींची ज्याप्रकारे निर्घृण हत्या केली, तसं इथे काही होऊ नये म्हणून मी पोलिसांना कळवले आहे. पोलीस त्यांचे काम करत आहेत. शोध घेत आहेत. गेली अनेक वर्षं आम्ही संरक्षण मागतोय. पण दिले जात नाही. येथे काही वाईट घडले तर त्याची पूर्ण जबाबदारी सरकारची असेल'', असा इशाराच सुनील राऊत यांनी दिला आहे.

# पातळ प्लास्टिक पिशव्यांचा वापर करू नये

## मनपा आयुक्त यशवंत डांगे यांची माहिती

**नगर : प्रतिनिधी**

**शासनाने सिंगल युज प्लास्टिकच्या वापरावर बंदी घातलेली असतानाही शहरात प्लास्टिकचा वापर मोठ्या प्रमाणात सुरू आहे. महापालिकेच्या पथकाने सिंगल युज प्लास्टिक पिशव्या वापरणाऱ्यांवर कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. बुधवारी तेलीखुंट व डाळमंडई येथे कारवाई करार ६० किलो प्लास्टिक जप्त केले. तर १५ हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला आहे. अशी माहिती आयुक्त यशवंत डांगे यांनी दिली.**



प्लास्टिकमुळे वाढत असलेल्या प्रदूषणामुळे राज्य शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर बंदी घातली आहे. अशा प्रकारच्या उत्पादनावरही बंदी घालण्यात आली आहे. मात्र, अद्यापही नागरिक, व्यापारी, दुकानदारांकडून सिंगल यूज प्लास्टिकच्या पिशव्यांचा वापर सर्रास सुरू आहे. माझी वसुंधरा अभियानात सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर पूर्णपणे निर्बंध आणून त्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नगर महानगरपालिकेने यापूर्वीही सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर कारवाई केली आहे. नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली आहे. नागरिकांच्या प्रतिसादामुळे महानगरपालिकेला सलग दोन वर्षे दुसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे.

आता महानगरपालिकेने माझी वसुंधरा अभियान ५.० व स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ मध्ये सहभाग घेतला असून या दृष्टीने उपाययोजना केल्या जात आहेत. आपले शहर सिंगल यूज प्लास्टिकमुक्त करण्याचा महानगरपालिकेचा मानस आहे. त्यादृष्टीने जनजागृती केली जात आहे. सिंगल यूज प्लास्टिकच्या वापरावर कारवाई केली जात आहे. नागरिकांनी पर्यावरणाचा विचार करून सिंगल यूज प्लास्टिकचा वापर बंद करावा, कागदी अथवा कापडी पिशव्या वापराव्यात, दुकानदार, खाद्यपदार्थ, भाजी विक्रेत्यांनीही सिंगल यूज प्लास्टिकच्या पिशव्या वापरू नये, शहर सिंगल यूज प्लास्टिकमुक्त करण्यासाठी नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त यशवंत डांगे यांनी केले आहे.

# पुन्हा सुरू केलेले कामही निकृष्टच!

## रूई फाटा-पठारे वस्तीच्या रस्त्याची स्थिती | दर्जेदार काम करण्याची मागणी

**सुपा : प्रतिनिधी**

**रूईछत्रपती फाटा ते पठारे वस्ती या रस्त्याचे काम निकृष्ट होत असल्याने पाच दिवसांपूर्वी ते बंद पाडण्यात आले होते. त्यानंतर हे काम पुन्हा सुरू झाल्याल्यानंतर दर्जामध्ये सुधारणा न झाल्याने ग्रामस्थांनी हे काम पुन्हा बंद पाडण्यात आले. तालुका दुध संघाचे अध्यक्ष दत्तानाना पवार, भैरवनाथ देवस्थानचे अध्यक्ष नितिन पठारे यांनी कामावर येत पाहणी केली असता कामामध्ये डांबराचा वापर कमी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी संबंधित ठेकेदारास अंदाजपत्रकाप्रमाणे काम करावे अन्यथा ग्रामस्थांच्या रोषाला समोरे जावे लागेल अशी तंबी दिली.**



■ वाळवणे ते पठारे वस्ती रस्त्याचे काम निकृष्ट होत असल्याने ते दुसऱ्यांदा बंद पाडण्यात आले.

### ठेकेदाराची दंडेलशाही

**कोणतेही शासकीय काम हे अंदाजपत्रकाप्रमाणे करण्यात येते. त्यात काही शंका उपस्थित झाल्यास समोरासमोर शंकचे निरसन केले जाते. या रस्त्याचे काम करणारा ठेकेदार मात्र दंडेलशाहीने वागत असल्याचे निदर्शनास आले. या ठेकेदाराला नेमका कुणाचा आश्रय आहे असा प्रश्न ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.**

वर्षभरापूर्वी रूई फाटा ते पठारे वस्ती या रस्त्याचे काम मंजुर झाले. मात्र वर्ष झाले तरी ठेकदाराने हे काम पुर्ण करण्याची तसदी घेतलीच नाही. त्यानंतर घाईने दोन दिवसांत रस्त्यावर खडी टाकून काम उरकण्याचा प्रयत्न सुरू होता. तो ग्रामस्थांनी हाणून पाडला. डांबराचा कमी वापर, पाणी न वापरणे, रोलींग न करणे अशा तक्रारी ग्रामस्थांकडून करण्यात आल्या.

या कामासंदर्भात दत्ता पवार यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता कोतकर यांच्याशी संपर्क साधून काम निकृष्ट असल्याचे निदर्शनास आणून दिले. त्यानंतर अभियंत्याने ठेकेदारालाच पाठीशी घालण्याचा प्रयत्न केल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

हा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे. २५ वर्षांपूर्वी या रस्त्याचे डांबरीकरण झाले होते. या रस्त्याच्या दुरूस्तीची अनेक वर्षांची मागणी होती. रूईछत्रपती येथे प्राथमिक आरोग्य केंद्र असल्याने सुपा परिसरातील रूग्णांना याच रस्त्याचा वापर करावा लागतो. शेतकऱ्यांनी पिकविलेला शेतमाल मुख्य बाजारपेठ असलेल्या सुपा, पारनेर, नगर, पुणे या ठिकाणी नेण्यासाठी याच रस्त्याचा वापर होतो. शाळा, महाविद्यालयीन विद्यार्थी, दुध उत्पादक शेतकरी, एमआयडीसीमध्ये कामासाठी जाणारे कामगार यांच्यासाठी हाच रस्ता उपयुक्त आहे. अशा स्थितीमध्ये या कामासाठी निधी मंजुर होऊन ते काम निकृष्ट होत असल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला.

# पारनेर येथे स्वदर्शन भवनाचे उदघाटन

## प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाची वास्तू

**पारनेर : प्रतिनिधी**

**प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालायच्या पारनेर येथील स्वदर्शन भवन या सेवा केंद्राच्या नुतन वास्तूचे उद्घाटन संस्थेच्या ग्रामविकास प्रभागाच्या राष्ट्रीय समन्वयक राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सुनंदा दीदी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी राणीताई लंके या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या.**



■ पारनेर येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालयाच्या स्वदर्शन भवन या वास्तूचे राजयोगिनी ब्रम्हाकुमारी सुनंदा दिदी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी पारनेर सेवा केंद्राच्या प्रभारी ब्रम्हाकुमारी साधना दिदी, राजयोगी बी के दशरथ भाईजी, अहिल्यानगर सेवा केंद्राच्या प्रभारी ब्रम्हाकुमारी राजेश्वरी दीदी, श्रीगोंदा सेवा केंद्राच्या प्रभारी ब्रम्हाकुमारी सुप्रभा दीदी, जामखेड सेवा केंद्राच्या प्रभारी ब्रम्हाकुमारी भारती दिदी यांच्यासह बी के डॉ. दीपक हरके हे उपस्थित होते.

यावेळी राणीताई लंके यांनी या कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या. पारनेर येथील सेवा केंद्राचे काम अतिशय उल्लेखनीय असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. त्यांनी पुढे सांगितले की, प्रजापिता ब्रम्हा जे दादा लेखराज या नावाने ओळखले जात होते. त्यांनी स्वातंत्र्यपुर्व काळात सन १९३७ मध्ये या संस्थेची स्थापना केली. पुढे सन १९५० मध्ये ही संस्था राजस्थानातील माउंट आबू येथे स्थलांतरीत करण्यात आले. पुर्ण विश्वात ५ महाव्दीप तसेच ११० देशांमध्ये या संस्थेची ओळख असून तिथे संस्थेने यशाची पताका फडकविली आहे.

या संस्थेचा समाजातील बहुतांश वर्गामध्ये प्रभाव असल्याचे लंके म्हणाल्या. माउंट आबू येथून या संस्थेची आध्यात्मिक ज्ञान यात्रा सुरू होउपन हळू हळू विविध भागात अनेक शाखांमध्ये विस्तारली असल्याचे लंके म्हणाल्या.

### काय आहे संस्थेचा उद्देश ?

**प्रजापिता ब्रम्हा परमात्मा दवारा विश्वात शांती, पवित्रता आणि संपन्नतेला पुन्हा प्रस्तापित करण्याच्या कार्यात ही संस्था सदैव आघाडीवर राहिली आहे. संपूर्ण मानव प्रजातला अज्ञान, दुःख तथा नैतिक अधः पतनातून बाहेर काडण्यासाठी तसेच ईश्वरद्वारा प्राप्त आध्यात्मिक ज्ञान संदेशाच्या माध्यमातून जागृती करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश आहे.**

**राणी लंके**
**मा. जि. प.सदस्या**

# विद्यार्थी दशेतच संशोधनाचा पाया घाला

## नारायण बाचकर यांचा सल्ला



**निघोज : प्रतिनिधी**

**भविष्यातले वैज्ञानिक घडविण्यासाठी विद्यार्थी दशेतच संशोधनाचा पाया घालणे गरजेचे असल्याचा सल्ला केंद्र प्रमुख नारायण बाचकर यांनी दिला.**

अहमदनगर जिल्हा मराठा शिक्षण प्रसारक समाज संस्थेच्या निघोज येथील श्री मुलिकादेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात शालेय स्तर गणित विज्ञान प्रदर्शनाच्या उदघाटनाप्रसंगी केंद्रप्रमुख बाचकर हे बोलत होते.

शिक्षणात गोडी निर्माण करण्यासाठी शालेय स्तरावरील गणित विज्ञान प्रदर्शनासारख्या उपक्रमांची आवष्यकता असल्याचे सांगत बाचकर म्हणाले, गणित विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये या दोन्ही विषयांमध्ये गोडी निर्माण होण्यास मदत होते असेही बाचकर यांनी सांगितले.

यावेळी विद्यालयाचे प्राचार्य के बी शिंदे, मुख्याध्यापक कैलास शिंदे, शिक्षिक मंगल भुकन, पालक, विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. या प्रदर्शनात बाल वैज्ञानिकांनी ८५ विज्ञान व गणित प्रतिकृती सादर केल्या. पालकांसह शिक्षण क्षेत्रातील तज्ञांनी या विज्ञान प्रदर्शनास भेट देत विद्यार्थ्यांच्या संशोधन वृत्तीचे कौतुक केले. आपल्या वैज्ञानिक प्रकल्पाची तांत्रीक व त्याच्या समाजासाठीच्या उपयोगितेची माहिती विद्यार्थ्यांनीच आत्मविश्वासाने उपस्थितांना दिली.

### चिमुकल्यांचीही भेट

**शाळा स्तरीय गणित विज्ञान प्रदर्शनास तनपुरेवाडी जिल्हा परिषद शाळा तसेच जिल्हा परिषद निघोज केंद्र शाळेच्या चिमुकल्यांनी भेट देऊन विविध उपकरणे पाहत कुतूहलाने त्याविषयी माहीती विचारत भविष्यात आम्हीही अशीच उपकरणे तयार करू असा आत्मविश्वासही व्यक्त केला.**

### यांच्या प्रतिकृती लक्षवेधी

**आदेश पवार, सार्थक घोगरे, विकर्ण निघोजकर, श्रेया लाळगे, सिध्दी वर्मा, सई पंदारे, वैष्णवी घोगरे, वेदांत वरखडे, ओम लंके, ईश्वरी ढवळे, स्नेहल ढवळे, अर्णवी चेमटे, सोहम काळे, आयुष लंके, वैष्णवी वराळ, आदित्य वाबळे, कार्तिक भोसले.**

# सौर ऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती गरजेची

## मनपा आयुक्त यशवंत डांगे यांचे प्रतिपादन



**नगर : प्रतिनिधी**

**कोळशासारख्या पारंपरिक ऊर्जा स्रोतांचे साठे मर्यादीत असल्याने भविष्यात ऊर्जेच्या शाश्वत पर्यायांकडे वळावे लागणार असून त्यादृष्टीने सौर ऊर्जेच्या वापराबाबत जनजागृती होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महानगरपालिका आयुक्त यशवंत डांगे यांनी केले.**

ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्ताने आयोजित जनजागृती रॅलीच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, महावितरणचे प्रभारी अधीक्षक अभियंता लक्ष्मण काकडे, कार्यकारी अभियंता योगेश चव्हाण, अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाऊसाहेब कुमावत, स्वप्नील उल्हे, महाऊर्जाचे आ ठाणगे, इलेक्ट्रीक इंजिनिअरींग कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष उमेश रेखे, ऑल इंडिया रिन्यूएबल एनर्जी असोसिएशनचे जिल्हा अध्यक्ष अमित काळे आदी उपस्थित होते.

श्री.डांगे म्हणाले, सौर ऊर्जा हा शाश्वत ऊर्जेचा स्रोत आहे. जिल्ह्यात वर्षभर सुर्यप्रकाश उपलब्ध होत असल्याने सौर ऊर्जेचा चांगला उपयोग विद्युत निर्मितीसाठी करता येईल. नागरिकांमध्ये या संदर्भात जागरूकता निर्माण करण्यात यावी.श्री.पाटील म्हणाले, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यात सौर ऊर्जा निर्मितीस मोठ्या प्रमाणात चालना देण्यात येत आहे. यासाठी आवश्यक जमीनदेखील उपलब्ध करून देण्यात येत आहे. शाश्वत ऊर्जेची उपलब्धता ही काळाची गरज आहे. शिवाय प्रदूषण नियंत्रणासाठीदेखील नैसर्गिक स्रोतापासून वीज निर्मिती करणे आवश्यक आहे. याबाबत महावितरणने जनजागृती घडवून आणावी, असे आवाहन त्यांनी केले.

श्री.शेळके यांनी प्रास्ताविकात रॅलीच्या आयोजनामागील भूमिका स्पष्ट केली. यावेळी पर्यावरणपूरक ऊर्जेचा वापर करण्याची प्रतिज्ञा घेण्यात आली. सावेडी नाका येथील महावितरणच्या कार्यालयापासून रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. फुलारी पेट्रोलपंप, प्रेमदान चौक, श्रीराम चौक, पालिका चौक, कलानगर चौक, आकाशवाणी, प्रोफेसर कॉलनीमार्गे महावितरणच्या मंडळ कार्यालयाजवळ रॅलीचा समारोप करण्यात आला.

# देवदैठण विद्यालयाची दुसऱ्यांदा राज्यस्तरावर निवड

## शालेय विभागीय मॉडर्न पेंन्टाथलॉन स्पर्धेत यश



**सुपा : प्रतिनिधी**

**श्रीगोंदे तालुक्यातील देवदैठण येथील श्री संत श्रेष्ठ निंबराज महाराज विद्याधाम प्रशालेच्या खेळाडूंनी विभाग स्तरावर शालेय मॉडर्न पेन्टाथलॉन स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करत विद्यालयाची दुसऱ्यांदा राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.**

पुणे येथे विभागीय क्रीडा संकुलात या स्पर्धा पार पडल्या. या स्पर्धेत १७ वर्षे वयोगटात शुभम विठ्ठल पवार याने प्रथम क्रमांक मिळविला. याच विद्यालयाच्या रिहान महंमद एहसान खान याने दुसरा क्रमांक पटकाविला. या दोन्ही गुणवंत खेळाडूंची सातारा येथे होणाऱ्या राज्यस्तरीय शालेय मॉडर्न पॅन्टाथलॉन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. ते राज्यस्तरीय स्पर्धेत पुणे विभागाचे नेतृत्व करणार आहेत.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक संदीप घावटे, अमोल कातोरे, सतीश झांबरे, सतीश कौठाळे, सोनाली शेळके, कांता मांडगे, अर्चना खंदारे, वंदना गायकवाड, स्वाती घुमरे, सुजाता पठारे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थी तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शिरूर शिक्षण प्रसारक मंडळ या संस्थेचे अध्यक्ष अनिल बोरा, सचिव नंदकुमार निकम, शाळा समितीचे अध्यक्ष चंदुलाल चोरडिया, मुख्याध्यापक विशाल डोके, पर्यवेक्षक नामदेव डुंबरे यांनी अभिनंदन करून सातारा येथे पार पडणाऱ्या पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत सलग दुसऱ्यादा यश संपादन केल्याबद्दल मार्गदर्शक शिक्षकांचे यावेळी विशेष कौतुक करण्यात आले.

# मुळा धरणातून आवर्तन सोडले
# शेतकऱ्यांनी सहकार्य करावे : आ. कर्डिले



**राहुरी : प्रतिनिधी**

**मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून वांबोरी चारीसाठी आवश्यक ती तरतूद करून योजना सुरळीत चालण्यासाठी शेतकऱ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन आमदार शिवाजी कर्डिले यांनी केले. मुळा धरणातून वांबोरी चारीला तसेच मुळा धरणाच्या उजव्या कालव्यातून आमदार कर्डिले यांच्या हस्ते पाणी सोडण्यात आले, यावेळी ते बोलत होते.**

आमदार कर्डिले म्हणाले,जिल्ह्यातील मंत्री म्हणून राधाकृष्ण विखे पाटील यांनी नुकतीच शपथ घेतली असून लवकरच ते पालकमंत्री होणार आहेत. जिल्ह्याच्या वाटचालीत नामदार विखेंचे योगदान असून ते मंत्री झाल्याने आपणच मंत्री झालो असे वाटत असल्याचे समाधान आहे. आपण सातत्याने वांबोरी चारीच्या लाभधारक शेतकऱ्यांना हक्काचे पाणी मिळावे म्हणून प्रयत्नशील असून पाटबंधारे विभागाने वांबोरी चारी देखभाल दुरुस्ती करिता चौदा कोटी रुपयांचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या माध्यमातून त्यासाठी आवश्यक ती तरतूद करण्यासाठी आपण पुढाकार घेऊ. मागील काळात शेतकऱ्यांवर एकोणावीस टक्के वसुलीची जबाबदारी टाकण्यात आली होती व उर्वरित जबाबदारी शासनाने उचलली होती तरी देखील आज अखेर शेतकऱ्यांकडे सुमारे साडेपाच कोटी रुपयांची थकबाकी आहे. दरवर्षी साधारणतः ७० लाख रुपये वीज बिलासाठी भरणे अपेक्षित आहे. याबाबत मंत्री विखे पाटील यांच्या माध्यमातून थकबाकी भरण्यासाठी देखील तरतूद करण्यासाठी प्रयत्न करू. परंतु शेतकऱ्यांनी देखील योजना सुरळीत सुरू राहण्यासाठी सहकार्य करणे अपेक्षित आहे.

# ब्लूमिंग बडस प्रशालेत क्रीडा महोत्सवाचा उत्साह !

## विविध स्पर्धांचे आयोजन

**सुपा : प्रतिनिधी**

**नारायणगव्हाण येथील समप्रभा शिक्षण संस्था संचलित ब्लूमिंग बडस इंग्लिश मिडियम प्रशालेत आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय क्रीडा महोत्सवामध्ये विद्यार्थ्यांचा उत्साह पहावयास मिळाला.**

प्रशालेच्या सर्व शिक्षकांच्या उपस्थितीत या महोत्सवाचे मोठया उत्साहात उद्घाटन करण्यात आले. वार्षिक क्रीडा महोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये खेळाविषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सध्याची बदलती जीवन शैली, विद्यार्थी हा मोबाईलच्या मायाजालामध्ये गुरफटला जात असताना त्यापासून दुर करत त्याला खेळा विषयी आवड निर्माण व्हावी या हेतूने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आल्याचे प्रशालेच्या प्रशासनाकडून सांगण्यात आले.

महोत्सवाच्या उद्घाटनानंतर विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते. कबड्डी, खो-खो, हॉलीबॉल या स्पर्धांमध्ये विविध वर्गातील विद्यार्थी सहभागी झाले. प्रशालेतील विद्यार्थ्यांनी आनंदाने सहभाग नोंदवत खेळांचा मनमुराद आनंद लुटला. अनेक संघानी प्रथम, व्दितीय, तृतीय क्रमांक पटकावित आपले नैपुण्य दाखविले.



वार्षिक क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकांनी परिश्रम घेतले. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष धनंजय नाईक यांनी या क्रीडा महोत्सवाचे आयोजन केले होते.

### निरोगी, सदृढ आरोग्यासाठी

**स्पर्धेच्या युगामध्ये विद्यार्थी अभ्यासामध्येच गुंतलेला असताना त्याच्या निरोगी तसेच सुदृढ आरोग्यासाठी मैदानी खेळांचीही आवष्यकता असते. आजकाल मैदानी खेळ मागे पडत चालले असून विद्यार्थ्यांना कमी वयात अनेक विकारांना सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थी तंदुरूस्त हवा, खेळातून उर्जा निर्माण होउन त्याचा अभ्यासातील उत्साह वाढावा या हेतूने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.**

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com